# मिरा भाईंदर महानगरपालिका
## समाजविकास विभाग
## प्रेस नोट

मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागा मार्फत "03 डिसेंबर जागतिक दिव्यांग दिन निमित्त सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.), आयुक्त तथा प्रशासक यांच्या हस्ते करण्यात आले, सदर कार्यक्रमासाठी श्री. अनिकेत मानोरकर, अति. आयुक्त श्रीम. कल्पिता पिंपळे, उप- आयुक्त (समाजविकास विभाग), श्री. मारुती गायकवाड, उप- आयुक्त (मुख्यालय) उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका समाजविकास विभागामार्फत आजमिती पर्यंत 2699 दिव्यांगाची नोंद विभागाकडे असुन दिव्यांगा करीता गतवर्षात म्हणजेच सन 2022-23 या वर्षात 1 कोटी 75 लक्ष एवढी तरतुद करण्यात आलेली होती परंतु मुळ तरतुदी पेक्षा जास्त् खर्च करुन दिव्यांगाना प्राधान्य दिलेले आहे. तसेच सन 2023-24 तरतुद 1 कोटी 75 लाख तरतुद करण्यात आलेली असुन आजमितीपर्यंत 39 दिव्यांग मुलेमुली यांना शाळेकरीता शैक्षणिक फी, 1065 दिव्यांग लाभार्थ्यांना पेंशन योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. तसेच महानगरपालिकेच्या बस सेवेमध्ये दिव्यांगाना 100 % प्रवासात सवलत देण्यात आलेली आहे.

"जागतिक दिव्यांग दिना" निमित्त मा. आयुक्त श्री. संजय श्रीपतराव काटकर यांनी 03 डिसेंबर पासुन दिव्यांगासाठी पे ॲण्ड पार्क मध्ये मोफत पार्किंग व्यवस्था तसेच फिजीयोथेरपी सेंटर सुरु करण्यात आलेले आहे, असे घोषित करण्यात आलेले आहे.

मा. आयुक्त सो. यांनी त्यांच्या मनोगतामध्ये दिव्यांग व्यक्ती हा समाजाचा एक अविभाज्य घटक असुन त्यांच्यामधील दिव्यांगत्वावर मात करण्यास सहाय्य करुन त्यांना कार्यक्षम, स्वावलंबी व समाजातील समावेशीत घटक बनण्यास आवश्यक ती शक्ती प्रदान करुन त्यांचे सक्षमीकरण करणे ही आपली नैतिक, सामाजिक व वैधानिक जबाबदारी असल्याचे म्हटले आहे.